# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २५/१२/२०२२ (रविवार)

---

## चोरी

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत भारकस शिवार. यातील फिर्यादी हे एमआयडीसी परिसरातील डिसी व्हीविंग कंपणीला भेट देण्याकरीता गेले असता, फिर्यादीला त्याचे कंपणीतील सामान अस्ताव्यस्त पडलेल्या अवस्थेत दिसले. तसेच जुने ॲल्यूमिनिअम चे तूटलेले तूकडे अंदाजे १०० किलो, लोखंडी व जर्मनी रोलर अंदाजे ५० किलो, कपडा बनविण्याचे जर्मनी पार्ट अंदाजे ३०० किलो, जूने स्टील रॉड अंदाजे ३० किलो, लोखंडी जनरेटरचा सायलेन्सर अंदाजे १०० किलो, जूना तूटलेला लोखंडी काटा अंदाजे १०० किलो, लोखंडी एंगल अंदाजे ५० किलो, असा एकूण ४०,०००/— रु चा माल कुणीतरी अज्ञात आरोपीने दिनांक २३/१२/२२ ते दि. २४/१२/२२ चे १८.०० ते ०३.०० वा दर. चोरुन नेले.

. सदर प्रकरणी फिर्यादी नामे— राम हनमंतराव नायडू वय ५० रा. गिट्टीखदान, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे.एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपी विरूध्द कलम ३७९ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ/ राजेंद्र डाहाके मो.नं. ९८२३५१७४१२ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन बेला** :— अंतर्गत मौजा खातखेडा ते सिर्सी रोडवर २५ किमी पुर्व. दिनांक २४/१२/२०२२ चे १६/३० वा दरम्यान, यातील वाहन क्र एम.एच.४० के.आर. ८१२१ चा चालक नामे नंदलाल ठोंबरे रा डोंगर मौदा ता कुही जि.नागपुर याने आपले ताब्यातील वाहन भरघाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन समोरून येणारे स्प्लेन्डर मोटर सायकल क्र एम.एच.३२ ए.एल. ०९८१ चा चालक नामे — सागर दिवाकर खडसे वय २५ वर्ष यास जोरदार धडक देऊन गंभीर जखमी केल्याने मोटर सायकल चालक जागीच मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— दिवाकर किसना खडसे वय ५३ वर्ष रा आंतरगाव त. समुद्रपुर जि वर्धा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे वाहन चालकाविरूध्द कलम २७९, ३०४(अ) भादवी सहकलम १८४ मोटर वाहन कायदा अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास— पोलीस उपनिरीक्षक . रामेश्वर राय ठेंगणे पोलीस स्टेशन बेला मो.न. ७९७२८१२५६९ हे करीत आहे.

## मोटर सायकल चोरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :– अंतर्गत हनुमान नगर कन्हान १ कि.मी उत्तर. दिनांक २३/१२/२२ चे १९/०० वा. दरम्यान, यातील फिर्यादी हा बाजार आण्याकरीता आपली बजाज कंपनीची मोटर सायकल क्र एम एच–४० ए ई – ४५८६ कि. २०,०००/– रू ची डीस्कव्हर मोटार सायकल वाल कंम्पाऊन्ड जवळ लॉक करून ठेवली असता, बाजार घेवून परत आल्यावर त्यांना त्याची मोटर सायकल ठेवलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही, ती कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कैलाश सकारामजी बडवाईक वय ३६ वर्ष रा. राधा कृष्ण नगर कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पो हवा हरिष सोनबद्रे ब नं १०३ मो क्र ९५२७६६६९२२ हे करीत आहे.

## प्राण्यांना निर्दयतेने डांबुन त्यांची अवैधरित्या वाहतुक करणा–यांवर कारवाई

**पोलीस स्टेशन कुही** :– अंतर्गत मौजा खापरी फाटा नागपूर उमरेड रोड क्र.३५३ डी २५ कि.मी. पश्चिम. दिनांक २४/१२/२२ चे ०२/०० वा. सुमारास यातील फिर्यादी व स्टॉफ नागपूर उमरेड रोड क्र ३५३ डी रोडवर मौजा खापरी फाटा येथे ऑल आऊट व कोंबींग ऑपरशान नाकाबंदी करीत असताना वेळ ०२.०० वा. सुमारास उमरेड कडून नागपूर च्या दिशेने एक विटकरी रंगाचे आयसर ट्रक दिसून आले. फिर्यादीने वाहन थांबवण्याचा इशारा केला परंतू सदर वाहन चालकाने त्यांचे ताब्यातील वाहन न थांबवता काही अंतरावर जावून रोडच्या खाली स्लोप मध्ये उतरवून ईलेक्ट्रीक पोलला धडकवले. फिर्यादीने पंचासमक्ष वाहना जवळ जावून पाहणी केली असता, आयसर गाडी क्र.एम.एच ४० बीएल ३५४२ ही दिसून आली. वाहन चालकाला वाहनामध्ये कोणता माल आहे ? असे विचारले असता त्यानी उडवा उडविची उत्तरे दिली. तेव्हा फिर्यादी व स्टाफने वाहना जवळ जावून पाहणी केली असता आयसर कंपनीच्या ट्रक डाल्यामध्ये एकुण २७ गोवंशी जणावरे निर्दयतेने डांबून कुचकून बांधून त्यांना चारापणी न देता कोंबून दाटीवाटीने अपुऱ्या जागेत जनावराना त्रास होईल अशा स्थितीत कत्तलीसाठी नेण्या करीता वाहतूक करीत असताना मिळून आले. सदर जनावरांची बाजार किमंती १०,०००/–रू. प्रमाणे २७ जनावरे एकुण किमंती २,७०,०००/– रूपये , तसेच आयसर गाडी किमंती ७,००,०००/–रू असा एकुण ९,७०,००० रू.चा मिळुन मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सरतर्फे स.फौ. विजय कुमरे पो.स्टे.कुही मो.नं. ९८२३९७१४५३ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे कुही येथे आरोपी नामे– १) मोहमंद रिजवान मोहमंद रफीक शेख वय २९ वर्ष रा. प्लॅाट नं. ९५ रफु सुलतान चौक शिवशक्ती नगर ,कंट्रोल उपलवाडी नागपूर यांचे विरूध्द कलम २७९, ४२७ भा.द.वी. सह कलम ११(१),११(१) (डी),११(१) (जी) प्रा.छ.प्र.अधि.१९६० सह कलम ५ ए (१) म.पशु.अधि.१९७६ सह कलम १८४,१३०,१७७,९ मो.वा. का अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.उप.नि. सोनकुसरे पो.स्टे. कुही मो.नं. ९०२१५४२९१८ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**

**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**